# कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ६५ /२०२५ — दि. ०८/०४/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १४/०४/२०२५ रोजी **' डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती '** निमित्ताने मिरवणुका निघणार आहे. सदरच्या मिरवणुका कल्याण पुर्व विभागातील जुना पुना लिंकरोड वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ड वॉर्ड, काटेमानिवली, कल्याण डोंबिवली मनपा कार्यालय, कल्याण पुर्व येथे येणार आहेत. सदर मिरवणुकांमध्ये सुमारे १२००० ते १५००० अनुयायी सहभागी होवुन सदर ठिकाणी येत असतात. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) उल्हासनगर, श्रीरामचौक कडुन जुना पुना लिंक रोडने विठ्ठलवाडी स्टेशन मार्गे कल्याण कडे येणा–या सर्व सहा चाकी वाहने, खाजगी बसेस, रा.प. विभागाचे बसेस, स्थानिक स्वराज्य संस्थांचे परिवहन बसेस व सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना विठ्ठलवाडी वाहतुक उपविभागाचे हद्दीत **श्रीराम चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने उल्हासनगर मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कल्याण पश्चिम तसेच उल्हासनगर कडुन स्व. आनंद दिघे उड्डाणपुल मार्गे कल्याण पुर्व कडे येणा–या सर्व सहा चाकी वाहने, खाजगी बसेस, रा.प. विभागाचे बसेस, स्थानिक स्वराज्य संस्थांचे परिवहन बसेस व सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना कल्याण वाहतुक उपविभागाचे हद्दीत **सम्राट चौक, वालधुनी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** कल्याण कडुन येणारी वाहने उल्हासनगर मार्गे तसेच उल्हासनगर कडुन येणारी वाहने कल्याण मार्गे पुढे

**प्रवेश बंद –** ३) मलंगगड रोड, कल्याण शिळ रोडने चक्कीनाका, कल्याण पुर्व मार्गे जुना पुना लिंक रोडने कोळसेवाडी, विठ्ठलवाडी, उल्हासनगर, कल्याण कडे येणा–या सर्व सहा चाकी वाहने, खाजगी बसेस, रा.प. विभागाचे बसेस, स्थानिक स्वराज्य संस्थांचे परिवहन बसेस व सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **चक्कीनाका, कल्याण पुर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मलंगगड रोड तसेच कल्याण शिळ रोडने इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. १४/०४/२०२५ रोजी सायंकाळी १६:०० ते दिनांक १५/०४/२०२५ रोजी रात्रौ ०१.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

CamScanner

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

CamScanner